महाराष्ट्र राज्य महिला आयोग

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

'पॉश' कायद्याबाबत आयोगाचा ऑनलाइन अभ्यासक्रम सुरु

वर्ष : १ अंक : ६

# साद

## दे, साथ घे

जुलै २०१९

# 'प्रज्ज्वला' : उदंड प्रतिसाद



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याबाबत (पॉश) देशातील पहिला ऑनलाइन अभ्यासक्रम

**अभ्यासक्रमातील ठळक घटक**

- लैंगिक छळ म्हणजे नेमके काय?
- कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची व्याख्या
- 'पॉश' कायदा
- 'पॉश' कायद्याचा परिणाम आणि प्रतिसाद
- आपण बदल कसा घडवू शकतो?




ऑनलाइन नोंदणी येथे करा : www.safindia.academy

SAF INDIA ACADEMY

PUSH people United against Sexual Harassment

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

साद
दे, साथ घे

RNI No. MAHMAR49593

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## आधारस्तंभ कोसळताना...

आपत्ती जशी नैसर्गिक असतात, तशाच काही मानवनिर्मितीही असतात. मानवी तस्करी, महिलांची फसवणूक या अशाच काही मानवनिर्मित आपत्ती. मात्र, या आपत्तींतून महिलांसाठी तारणहार ठरलेल्या माजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांचे जाणे म्हणजे एका आधारस्तंभाचे कोसळणे असल्याची भावना दाटली आहे. परराष्ट्र मंत्री हे केंद्रीय मंत्रिमंडळातील एक महत्त्वाचे पद आहेच, तसेच ते अत्यंत रूक्ष आणि काहीसे सामान्यांपासून तुटलेलेही असते. सुषमाजींनी या समजुतीला छेद दिला. एखादा परराष्ट्र मंत्री सामान्य माणसांच्या मदतीला कसा धावून जातो, याचे त्या मूर्तिमंत उदाहरण होत्या. आखाती देशांत अडकलेले, आफ्रिकेत अडकवलेल्या अनेक भारतीयांनी सुषमाजींना मदतीसाठी साद घातली आणि सुषमाजी एखाद्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे त्या हाकेला धावून गेल्या. अंबरनाथच्या फरिदा खानच्या बाबतीत, पाकिस्तानातून आलेली गीता ही मूकबधिर मुलगी असो सुषमाजींची सक्रियता मी अत्यंत जवळून अनुभवली आहे. त्यांचे जाणे खरेच देशाची अपरिमित हानी करणारे आहे.

कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ ही एक मोठी समस्या आहे. केवळ आपल्या देशातच नव्हे तर इतरत्रही ही समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवते. हा छळ रोखण्यासाठी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदाही आहे. विशाखा समित्यांसारख्या संस्थात्मक रचनाही आहे. तरीही हे प्रकार आपण पूर्णपणे रोखू शकलेलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. आयोगाने या विषयावर नेहमी सकारात्मक आणि क्रियाशील भूमिका घेतली आहे. आताही सॅफ इंडिया या संस्थेच्या सहकार्याने आयोगाने कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या प्रचार, प्रसारासाठी एक ऑनलाइन कोर्स सुरू केला आहे. त्याचा शुभारंभ नुकताच केंद्रीय कामगारमंत्री संतोष गंगवार यांच्या हस्ते पुण्यात झाला. महिलांसाठी काम करणाऱ्या विविध संस्था, कंपन्यांतील मनुष्यबळ क्षेत्रातील अधिकारी, शिक्षणसंस्था आदी अनेक क्षेत्रांतील मंडळींसाठी हा ऑनलाइन अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. यातील माहितीचा वापर आपापल्या संस्थांमध्ये करणे शक्य आहे. कायद्याची किचकट परिभाषा समजून घेणे प्रत्येक व्यक्तीला शक्य नसते, परंतु, कायद्याची माहिती करून घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यही असते. त्या कायद्यांचे पालन करणे हेही आपले कर्तव्य आहे, त्या दृष्टीने हा अभ्यासक्रम अत्यंत उपयोगी ठरेल, अशी आशा वाटते. अशाच प्रकारचे उपक्रम आयोग भविष्यातही राबवेल, याची हमी अध्यक्ष या नात्याने मी आपल्याला देते.



**विजया रहाटकर,** मुख्य संपादक आणि
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

# अंतरंग...



७

पूरग्रस्तांना धीर देण्यासाठी महिला आयोग सरसावला



१२

ममतेचे माहेरघर

सुषमा स्वराज यांच्या निधनानंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी 'सकाळ'मध्ये लिहिलेल्या लेखाचा संपादित अंश...



३४

ताणनिवारणाची चतुःसूत्री

घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. त्यावर मात करण्यासाठी चतु:सूत्री उपयुक्त ठरेल.



३६

एस. आय. पी : गुंतवणुकीचा स्मार्ट पर्याय

आपल्या उत्पन्नामधून आवश्यक खर्च वजा करता दरमहा आपण किती रक्कम गुंतवू शकतो याचा अंदाज घेऊन त्यानुसार एस.आय.पी ची रक्कम ठरवायची. निरनिराळ्या आर्थिक उद्दिष्टांसाठी निरनिराळी एस.आय.पी. केल्यास आर्थिक नियोजन करणे अधिक सुलभ होते.

# महिलांना समान वेतन, समान वेळ यासाठी सरकार आग्रही

## 'पॉश' कायद्याबाबत ऑनलाइन कोर्सचा केंद्रीय मंत्री संतोषकुमार गंगवार यांच्या हस्ते शुभारंभ

**पुणे :** कामांच्या ठिकाणी लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा (POSH), त्याचे महत्व आणि त्याच्या प्रशिक्षणासाठी राज्य महिला आयोगाने तयार केलेला ऑनलाइन कोर्सचा शुभारंभ नुकताच केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री श्री. संतोषकुमार गंगवार यांच्या हस्ते झाला. महिलांना कामाच्या ठिकाणी समान वेतन, समान वेळ यासाठी आमचे सरकार आग्रही असल्याचे ते म्हणाले.

यावेळी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, खासदार गिरीश बापट, आमदार माधुरी मिसाळ, आमदार मेधा कुलकर्णी, योगेश गोगावले, शिरीषा साठे, शीतल बापट उपस्थित होते.

### ऑनलाइन कोर्स सुरू करणारा महाराष्ट्र राज्य महिला आयोग देशात पहिलाच

'केंद्रीय स्तरावर स्त्री-पुरुष समानतेसाठी विविध पातळ्यांवर उपक्रम राबविण्यात येत आहेत. यासाठी स्वतंत्र कायदे आहेत, धोरणे केली आहेत. कामगारांनाही समान वेतन देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याच वेळी पालकांकडूनही मुलांवर समानतेचा संस्कार केले पाहिजे. घरात दोघांना समान वागणूक देणे पालकांची जबाबदारी आहे. स्त्रियांना सन्मान न देणाऱ्या समाजाची अधोगती होते,' असे मत केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री संतोषकुमार गंगवार यांनी व्यक्त केले. गंगवार यांनी केंद्र सरकारतर्फे गेल्या काही वर्षांत कामगारांच्या सुरक्षेसाठी घेतलेल्या निर्णय, बाल मजुरांचे प्रमाण रोखण्यासाठी केलेला कायदा, सर्वांना समान वेतन, प्रसुती रजांमध्ये केलेली वाढ याची माहिती देऊन आगामी उपक्रमाची माहिती दिली. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणापासून मुक्त करण्यासाठी 'पॉश' हा कायदा तयार करण्यात आला आहे. या कायद्याचे प्रशिक्षण सर्व कंपन्या आणि कार्यालयांमध्ये देण्याचे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. या ठिकाणी अंतर्गत समिती नेमणेही बंधनकारक आहे. मात्र, कार्पोरेट कंपन्या आणि इतर कार्यालयांत याबद्दल जागृती नाही. त्यामुळे आयोगाने 'पीपल्स युनायटेड अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट (पुश)' या मोहिमेअंतर्गत ४० हजार कर्मचाऱ्यांना कायद्याचे प्रशिक्षण दिले आहे. याचेच पुढचे व्यापक पाऊल म्हणून ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती रहाटकर यांनी दिली. गिरीश बापट आणि योगेश गोगावले यांनीही मनोगत व्यक्त केले.




> **कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्याबद्दल सविस्तर माहिती देणारा ऑनलाइन अभ्यासक्रम 'एसएएफ इंडिया अकादमी'च्या सहभागातून राज्य महिला आयोगाने तयार केला आहे. ऑफिसमध्ये, घरी अथवा कोठेही बसून हा ऑनलाइन अभ्यासक्रम प्रत्येकाला पूर्ण करता येईल. यानंतर आयोगातर्फे प्रशिक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे. या कायद्याबद्दल ऑनलाइन अभ्यासक्रम घेणारा हा देशातील पहिलाच आयोग आहे.**
>
> – **विजया रहाटकर,** अध्यक्ष, राज्य महिला आयोग

पुण्यात १४ ऑगस्टला राज्य महिला आयोगाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ऑनलाइन अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाची क्षणचित्रे...



दीपप्रज्वलन करताना विजया रहाटकर. समवेत केंद्रीय मंत्री संतोष गंगवार आणि पुणे शहर भाजपचे अध्यक्ष योगेश गोगावले.



दीपप्रज्वलन करताना संतोष गंगवार समवेत विजया रहाटकर, योगेश गोगावले, आमदार माधुरी मिसाळ, खासदार गिरीश बापट, आमदार मेधा कुलकर्णी.









# पूरग्रस्तांना धीर देण्यासाठी महिला आयोग सरसावला

## आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांना भेटी

## महिलांसाठी आवश्यक वस्तूंचीही मदत

**सांगली/कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पूरग्रस्त सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांना भेट देऊन लोकांना धीर दिला. महिलांना आवश्यक वस्तू यावेळी देण्यात आल्या; तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनीधी, शासकीय यंत्रणांशीही मदत कार्याबाबत चर्चा केली.

दोन दिवसाच्या दौऱ्यावर असलेल्या आयोगाच्या अध्यक्षांनी सांगली जिल्ह्यात सांगलीवाडी, शहर बाजारपेठ परिसर, हरिपूर या भागांत पाहणी करुन नागरिकांची विचारपूस केली. सांगलीचे खासदार संजयकाका पाटील, आमदार सुधीर गाडगीळ यांच्याशी पूर ओसरल्यानंतरची परिस्थिती, मिळणारी मदत याबाबत चर्चा केली.

कोल्हापुर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नृसिंहवाडीत पाहणी करुन गावात साफसफाईसाठी आलेल्या राज्यातील लोकांच कौतुक केले. ग्रामीण भागातील अकिवाट, कुरुंदवाड, खिद्रापुर येथील लोकांशी संवाद साधत धीर दिला. राधानगरी आणि करवीर तालुक्यात हळदी, आरे, राशिवडे गावात घरोघरी जात महिलांच्या समस्या समजून घेतल्या.

यासर्व गावात महिलांना अंतर्वस्त्र, ब्लाऊज, साडी परकर, सॅनिटरी पॅड, ब्लँकेट यांचे संच यावेळी देण्यात आले. शाळा पुन्हा सुरु झाल्यानंतर लहान मुलांना आवश्यक शैक्षणिक साहित्यही देण्यात आले.

याआधी आयोगाकडून पूर ओसरल्यानंतर आरोग्याच्या काळजीच्या दृष्टीने सॅनिटरी नॅपकिन्स तसेच वृद्धांकरिता ॲडल्ट डायपरची गरज भासू शकते, याचा विचार करुन १० हजार सॅनिटरी पॅडस, २ हजार ॲडल्ट डायपर देण्यात आले होते. शासन या परिस्थितीबाबत संवेदनशील असून महाराष्ट्र शासनाने तातडीने दिलेली पाच हजारांची रक्कम, जीवनावश्यक वस्तू लोकांना पोहोचल्यानंतर आता सविस्तर पंचनामे सुरु आहेत. यातून पुढच्या टप्प्यातील मदत आणि पुनर्वसन कार्य वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी पूरग्रस्तांना दिला.











# पूरग्रस्त महिलांच्या आरोग्याची आयोगाकडून काळजी

## १० हजार सॅनिटरी पॅड; २ हजार अॅडल्ट डायपर रवाना

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थितीचा सामना करणाऱ्या महिला, वृद्ध यांच्या आरोग्याचा विचार करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून या जिल्ह्यात १० हजार सॅनिटरी पॅड, २ हजार अॅडल्ट डायपर देण्यात आले आहेत.

राज्यातील पूरग्रस्त जिल्ह्यात जनजीवन पूर्वपदावर येण्यासाठी शासनाकडुन मदत कार्य सुरू आहे. राज्यभरातून अन्न धान्य, कपडे मोठ्या प्रमाणावर या जिल्ह्यात पोहचत आहे. मात्र आता पूर ओसरल्यानंतर आरोग्याच्या काळजीच्या दृष्टीने सॅनिटरी नॅपकिन्स तसेच वृद्धांकरिता अॅडल्ट डायपरची गरज भासू शकते, याचा विचार करुनच मदत स्वरूपात या गोष्टी आयोगाकडून दिल्या आहेत.

अनेक स्वयंसेवी संस्था या जिल्ह्यांकरिता पुढे येत आहेत. प्रशासकीय यंत्रणा युद्धपातळीवर आपले काम करत असून, मुख्यमंत्री



सहायता निधीतून ही लोकांना मदत देण्यात येत आहे. या प्रयत्नांत आयोग ही आपला खारीचा वाटा उचलत असल्याचे आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी सांगितले.

# पाऊल निरागसतेच्या रक्षणाचे

लहान मुलांच्या कोवळ्या निरागसतेला नख लावणाऱ्या प्रवृत्तींना रोखण्यासाठी सरकारने पाऊल उचलले असून, लैंगिक अत्याचारापासून बालकांच्या संरक्षणाची तरतूद असलेले विधेयक नुकतेच मांडण्यात आले. त्याची आवश्यकता का जाणवली, याची मीमांसा करणारा आणि 'चाईल्ड पोर्नोग्राफी'चे गांभीर्य स्पष्ट करणारा लेख.

**विजया रहाटकर**
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

बालकांचे अश्लील चित्रण, लैंगिक कृत्यं करण्यास बालकांना भाग पाडणे, बालकांच्या अज्ञानाचा, अजाण वयाचा गैरफायदा घेत लैंगिकतेसाठी त्यांचा वापर करणे हा प्रश्न तुम्हाला किती गंभीर वाटतो? मला कल्पना आहे, की सुसंस्कृत व्यक्तींना हा प्रश्न विचारणंदेखील अवमानास्पद वाटू शकेल. वास्तव मात्र भयाण आहे. समाज दिसतो तेवढा सुसंस्कृत आहे का, असा प्रश्न उपस्थित करण्याची गरज निर्माण झाली आहे. 'अल्पवयीन मुलीवर अत्याचार', 'दोन वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून खून', 'बालकासोबत अनैसर्गिक संभोग केल्याने प्रौढाला अटक' असे अक्षरशः अंगावर काटा आणणारे मथळे अधूनमधून माध्यमांमधून ऐकायला-वाचायला मिळतात. जीवाचा थरकाप उडतो, संतापानं मन पेटून उठतं. ज्या वयात शरीराची देखील नीटशी ओळख झालेली नसते त्या अल्लड वयातल्या मुला-मुलींना वासनेची शिकार बनवणाऱ्यांना माणूस तरी कसं म्हणायचं?

कदाचित काहींना असंही वाटू शकेल, की 'घडत असतील अशा अपवादात्मक घटना, पण त्याची इतकी खुलेपणानं चर्चा करण्याची गरज नाही. भारतातल्या बालकांना लैंगिक गुन्ह्यांचा तितका धोका नाही.' हा गैरसमज खरा ठरला असता, तर मला मनापासून आनंदच झाला असता. दुर्दैवानं वस्तुस्थिती भीषण आहे. २००७मध्ये महिला व बालविकास मंत्रालयानं तेरा राज्यंमधल्या साडेबारा हजार बालकांचं सर्वेक्षण केलं होतं. भयावह बाब ही, की यातल्या अर्ध्यापेक्षा जास्त म्हणजे ५३% बालकांनी ते एकदा किंवा अनेकदा लैंगिक अत्याचारांना बळी पडले असल्याचं सांगितलं. म्हणजेच दर दोनपैकी एका बालकाचं लैंगिक शोषण झालेलं आहे. २० टक्के बालकांनी गंभीर स्वरूपाच्या लैंगिक अत्याचारांना तोंड द्यावं लागलं असल्याची कबुली दिली. लैंगिक अत्याचार सोसलेल्या या बालकांमध्ये ५७ टक्के मुलगे आणि उरलेल्या मुली होत्या. २०१४च्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्यूरोच्या (एनसीआरबी) आकडेवारीनुसार वय वर्षे अठरापर्यंतच्या एक लाख लोकसंख्येपैकी २०.१ जणांवर लैंगिक अत्याचार झालेले आहेत. बालकांवरील बलात्कारांची २०१५ मधली देशातली नोंद एकूण १० हजार ८५४ होती. पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या बाललैंगिक अत्याचारांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे.

## वाढती विकृती

तंत्रज्ञानाचा म्हणजेच टीव्ही, इंटरनेट, मोबाईल यांचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. लैंगिक अत्याचाराच्या अनेक घटनांमध्ये गुन्हेगार बालकांचे आक्षेपार्ह फोटो किंवा व्हिडीओ काढतो. हे सगळं चित्रण जगजाहीर करण्याची धमकी देत पीडित बालकाला गप्प केलं जातं आणि परत परत त्याच्या-तिच्यावर अत्याचार केला जातो. बालकांबद्दल लैंगिक वासना असणारी विकृती समाजात वाढते आहे. तंत्रज्ञानाच्या साह्यानं बालकांचा वापर पोर्नोग्राफीसाठी करण्याची संतापजनक प्रवृत्ती यातून पुढं येत आहे. हे सगळं रोखण्यासाठी कडक पाऊल उचलण्याची नितांत गरज सध्या होती. महिला आयोगाच्या माध्यमातून आम्ही हा विषय सातत्यानं राज्यातल्या आणि केंद्रातल्या सरकारपुढं मांडत आलो आहोत. बाललैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी कालसुसंगत कायद्यांची निर्मिती, अस्तित्वातल्या कायद्यांमध्ये सुधारणा ही काळाची गरज आहे. मात्र त्यासाठी आधी 'चाईल्ड पोर्नोग्राफी' म्हणायचं कशाला, याची नेमकी स्पष्ट व्याख्या करणं



फार गरजेचं होतं. आजवर देशात ती कोणी केली नव्हती.

केंद्रातल्या नरेंद्र मोदी सरकारने पहिल्यांदा या दृष्टीनं विचार केला आहे. केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री स्मृती इराणी या बाबतीत संवेदनशील आहेत. आम्ही जेव्हा त्यांच्याकडे हा विषय मांडला, तेव्हा त्यांना चटकन त्याचं गांभीर्य लक्षात आलं. वेगाने चक्रे हलली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कॅबिनेटने निर्णय घेतला आणि आता नव्या सरकारच्या पहिल्याच पावसाळी अधिवेशनात 'चाईल्ड पोर्नोग्राफी'ची व्याख्या निश्चित करणाऱ्या सुधारणेचा समावेश असणारे विधेयक पटलावर येत आहे. 'लैंगिक अत्याचारांविरोधात बालकांचे संरक्षण सुधारणा विधेयक' (प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन अगेन्स्ट सेक्सुअल ऑफेन्सेस अमेंडमेंट बिल) लवकरच मंजूर होईल, अशी आशा आहे. नुकतेच ते राज्यसभेत सादर झाले आहे.

## कडक शिक्षेची तरतूद

लैंगिक क्रियांसाठी बालकाला प्रत्यक्ष स्पर्श न करताही त्याच्यावर अत्याचार केले जाऊ शकतात. गुन्हेगार बालकांना अश्लील चित्रीकरण किंवा छायाचित्र दाखवतो. बालकांचा उपयोग या प्रकारच्या चित्रीकरणासाठी केला जाऊ शकतो. या चित्रीकरणाचा व्यावसायिक वापर होऊ शकतो. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बालकांचं लैंगिक शोषण होऊ शकतं. यांसारख्या अनेक बारीकसारीक मुद्द्यांचा समावेश 'चाईल्ड पोर्नोग्राफी'च्या विस्तृत आणि सर्वसमावेशक व्याख्येत करण्यात आला आहे. त्यामुळे बालकांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या विकृत मनोवृत्तीला कडक शिक्षा करणं शक्य होईल. साध्या सोप्या भाषेत सांगायचं, तर लैंगिक गैरहेतूनं बालकांची काढलेली छायाचित्रं, चित्रीकरण, डिजिटल किंवा संगणकीकृत चित्रं आदी कोणत्याही प्रकारचं साहित्य यापुढं 'चाईल्ड पोर्नोग्राफी' ठरणार आहे. कोणाचाही मोबाईल, संगणक आदींमध्ये 'चाईल्ड पोर्नोग्राफी' आढळून आली, तर संबंधित गुन्ह्यासाठी कडक शिक्षेची तरतूद या नव्या विधेयकात करण्यात आली आहे. बालकांवरील लैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी 'पोक्सो' कायद्याची व्याप्ती वाढवण्याचाही प्रस्ताव आहे. लक्षात घ्या, यापूर्वी देशातला कोणत्याच 'आयटी अँक्ट' किंवा 'आयपीसी'मध्ये चाईल्ड पोर्नोग्राफीची स्पष्ट व्याख्या केली गेली नव्हती. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी ही अडचण दूर केली. त्यांचे अभिनंदन. बालकांचं आयुष्य कुस्करणाऱ्या वासनांधांच्या मुसक्या आवळण्यास यामुळं मदत होणार आहे.

**(सौजन्य : सकाळ)**

# सुषमा स्वराज : सुसंस्कृत नेता, तेजस्वी वक्ता हरपला



## राज्य महिला आयोगाचा आधार तुटला

**नवी दिल्ली :** धडाडीच्या राजकीय नेत्या, वक्ता दशसहस्रेषु असे वर्णन केल्या जाणाऱ्या माजी परराष्ट्रमंत्री आणि वरिष्ठ भाजप नेत्या सुषमा स्वराज (वय ६७) यांचे ६ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाले. त्यांना रात्री नऊ वाजता हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अडीच वर्षांपूर्वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्याने स्वराज यांच्या हालचालींवर मर्यादा आल्या होत्या. त्यानंतरही त्यांनी परराष्ट्र मंत्रिपदाची सूत्रे धडाडीने हलविली होती. दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री, सर्वांत कमी म्हणजे केवळ २५ व्या वर्षी हरियानासारख्या राज्याच्या मंत्री राहिलेल्या सुषमा स्वराज यांनी अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी या दोन्ही भाजप सरकारच्या काळात मंत्रिपद भूषविले होते.

किडनी निकामी झाल्यामुळे स्वराज यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर त्यांनी तातडीने निवासस्थानही सोडले होते. जंतरमंतर परिसरातील आपल्या निवासस्थानी राहत होत्या. राजकीयदृष्ट्या त्यांनी अतिशय तल्लख प्रतिक्रिया नोंदवणे सुरू ठेवले होते. जम्मू आणि काश्मीरचे ३७० वे कलम रद्द करण्याचे विधेयक नरेंद्र मोदी सरकारने काल राज्यसभेत मंजूर केल्यावर स्वराज यांनी तातडीने ट्विट करत सरकारचे विशेषतः गृहमंत्री अमित शहा यांच्या भाषणाचे कौतुक केले होते. स्वराज यांच्या निधनाचे वृत्त समजताच संरक्षणमंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री हर्ष वर्धन, गडकरी आदी नेत्यांची रीघ 'एम्स'कडे लागली. प्रभू श्रीकृष्णाच्या निस्सीम भक्त असलेल्या सुषमा स्वराज यांची कारकीर्द वादळी राहिली. २०१४ मध्ये परराष्ट्रमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर स्वराज यांनी एकतेसाठी जी कामगिरी केली ती उल्लेखनीय ठरली. राष्ट्रसंघात केलेल्या भाषणात त्यांनी वेळोवेळी पाकिस्तानचा बुरखा फाडला. त्यामुळे त्यांचे परराष्ट्र मंत्रिपद संस्मरणीय ठरले. परदेशात अडकलेल्या हजारो भारतीय नागरिकांना स्वराज यांनी एका ट्विटर संदेशावर तातडीने कारवाई करत मुक्त केले आहे. त्यांची ही कामगिरी भारतीय इतिहासात कायमस्वरूपी स्मरणात राहणारी आहे. स्वराज यांनी सक्रिय निवडणूक राजकारणातून निवृत्ती पत्करली तरी राजकारणातून निवृत्ती पत्करली नव्हती. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि स्वराज यांच्यात अनेकदा राजकीय मतभेद होऊनही दोघींतील संबंध जिव्हाळ्याचे राहिले होते.

**वृत्त सौजन्य : सकाळ**

**सुषमा स्वराज यांच्या निधनामुळे भारतीय राजकारणात न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. विरोधी पक्षनेत्या, केंद्रीय मंत्री, रणनीतीकार अशी पक्ष देईल ती जबाबदारी निष्ठा व प्रयत्नपूर्वक पूर्ण करणाऱ्या स्वराज म्हणजे भाजपचा आधारवड होत्या. चार दशकांहून अधिक काळ राजकारणात सक्रिय असलेल्या स्वराज यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे.**

### कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे

| | |
|---|---|
| १९७७ ते १९८२ | वयाच्या २५व्या वर्षी हरयाणा विधानसभेच्या आमदार |
| १९७७ | जनता पक्षाच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री |
| १९७९ | जनता पक्षाच्या हरयाणाच्या प्रदेशाध्यक्ष |
| १९८७ ते १९९० | हरयाणाच्या शिक्षणमंत्री |
| १९९६ | केंद्रात पुन्हा माहिती व दूरसंचार मंत्री, चित्रपटाला उद्योगाचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय |
| १९९८ | दिल्लीच्या मुख्यमंत्री |
| १९९९ | सोनिया गांधींविरोधात बल्लारी येथून लोकसभा निवडणूक लढवली. मात्र, अल्प मतांनी हार |
| २००० ते २००३ | पुन्हा माहिती व दूरसंचार मंत्री |
| २००३ ते २००४ | केंद्रीय आरोग्यमंत्री, या काळात सहा ठिकाणी 'एम्स'ला सुरुवात |
| २००६ | तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवडून गेल्या |
| २००६ ते २००९ | राज्यसभेत विरोधीपक्षाच्या उपनेत्या |
| २००९ | विदिशा येथून लोकसभेची निवडणूक ४ लाख मतांनी जिंकली |
| २००९ ते २०१४ | लोकसभेत आक्रमक विरोधी पक्षनेत्या |
| २०१४ ते २०१९ | परराष्ट्र मंत्री. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची धोरणे यशस्वीपणे राबवली. |

# ममतेचे माहेरघर



**विजया रहाटकर**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

तीन वर्षांपूर्वीची घटना आहे. मर्चंट नेव्हीमध्ये काम करणारा औरंगाबादचा एक युवक इराकमध्ये अपघातात मृत्युमुखी पडला होता. पण हे दुःखद वृत्त त्याच्या कुटुंबीयांना दोन दिवसांनी समजले; ते ही अर्धवट. नेमके काय झालंय, ते समजत नव्हते. तरुण मुलाच्या वियोगाने आईने तर अंथरुण धरले होते. मी त्या रात्री (परराष्ट्रमंत्री) सुषमाजींना दूरध्वनी केला. त्या घाईत होत्या, म्हणाल्या, 'उद्या भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत भेटू.' भेट झाली आणि सगळा प्रकार त्यांच्या कानावर घातला. बैठक संपल्यानंतर बघू, एवढंच त्या म्हणाल्या. बैठक सायंकाळी सात वाजता संपली आणि बरोबर सव्वा आठच्या सुमारास त्यांचा स्वतःचा दूरध्वनी आला. 'विजया, युवकाचा मृत्यू झाल्याची बातमी खरी आहे. पण तिथे नवरोज सण चालू असल्याने शव मिळविणे खूप अवघड आहे. इराकमध्ये कार्यालयांना पंधरा दिवस सुटी आहे. पण बघते...'

तीन- चार दिवसांनी मुंबईतून एका कस्टम अधिकाऱ्याचा दूरध्वनी आला आणि म्हणाला, 'सुषमाजींनी तुमचा नंबर दिलाय आणि ते शव कुठे पाठवू?' मला तर संदर्भ लक्षात येईना. तेव्हा तोच म्हणाला, 'अहो, परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांचा दस्तुरखुद्द मला फोन आला होता. मी साधा अधिकारी; पण त्यांनी स्वतःहून फोन केला.' तो खूप भारून सांगत होता. मला तर धक्काच होता. हे त्यांनी केलं, कदाचित त्यांच्यामध्ये तुडुंब भरलेल्या ममत्वामुळे! हे केवळ त्या घटनेपुरते नक्कीच मर्यादित नव्हते. कारण त्यांनी परराष्ट्रमंत्री म्हणून परदेशात संकटात सापडलेल्या नव्वद हजारांहून अधिक भारतीयांना सुखरूप आणलंय.

माझी त्यांच्याशी ओळख २००९ मधील निवडणुकीपासूनची. पण त्यांच्याशी खरी जवळीक निर्माण झाली ती मी २०१४ मध्ये भाजप महिला मोर्चाची राष्ट्रीय अध्यक्षा झाल्यानंतर आणि भाजपची सर्वोच्च संस्था असलेल्या संसदीय पक्षाच्या बैठकांमध्ये त्यांच्यासोबत सहभागी होऊ लागल्यानंतर. प्रत्येक वेळेला महिला मोर्चाची कार्यक्रमांची माहिती त्या घेत आणि प्रत्येकवेळेला एकच सल्ला असायचा... महिलाओंने गरिमा रखनी चाहिए! त्या स्वतःच

**गरिमा म्हणजे शालीनतेचे मूर्तिमंत उदाहरण!**

त्यांचा आणखी एक स्वभाव म्हणजे तपशीलांवर बारीक लक्ष. त्यांच्याकडे पाठविल्या जाणाऱ्या कागदपत्रांचा त्या बारकाईने अभ्यास करीत. तपशिलात काही चुका राहिल्यास त्यांना अजिबात आवडत नसे, असाच एक प्रसंग आठवतोय. अंबरनाथच्या फरिदाला फसवून ओमानला नेले होते. चार महिन्यांपासून तिचा पत्ता नव्हता. तिच्या नवऱ्याच्या तक्रारीवरून मी सुषमाजींना विनंती पत्र लिहिले होते. त्यांनी त्याची दखल घेतली आणि काही कालावधीतच भारत सरकारच्या खर्चाने तिची सुखरूप पाठवणी केली. पुढे महिला आयोगाने दिल्लीमध्ये 'एनआरआय' विवाहांमधील फसवणुकीबाबत आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटनाला त्या आल्या होत्या. त्या वेळी फरिदाला भेटून त्यांना खूप आनंद झाला. तिला त्यांनी प्रेमाने जवळ घेतले. याच परिषदेच्या बातम्या वाचून आणि फरिदाची कहाणी ऐकून पंजाबमधील एका महिलेची सुटका झाली, तेव्हा त्यांचा मला फोन आला आणि म्हणाल्या, 'विजया, हे तुझे श्रेय!' त्यांच्याशी माझे जिव्हाळ्याचे, घरोब्याचे संबंध होते. त्यांच्याशी शेवटची भेट लोकसभेपूर्वीची. केंद्रीय निवडणूक समितीची बैठक झाल्यानंतर रात्री अकराच्या सुमारास त्या माझ्याशी चक्क पार्किंगमध्ये खूप वेळ बोलत होत्या. त्यांच्या जाण्याने देशाची, पक्षाची हानी झालीच आहे; पण माझे व्यक्तिगत नुकसान झालंय, मार्गदर्शक हरवल्यासारखी भावना मनात दाटलीय.




## राज्य महिला आयोगाच्या 'पेट्रन'

२६ जुलै २०१८ रोजी नवी दिल्ली येथे राज्य महिला आयोगाच्यावतीने मानवी तस्करी विरोधात राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. सुषमाजी प्रमुख पाहुण्या म्हणून या परिषदेला उपस्थित होत्या. ही उपस्थिती केवळ औपचारिक नव्हती. सुषमाजींनी मानवी तस्करी याविषयावर अत्यंत कळकळीने विचार मांडले. अनिवासी भारतीय पतींकडून महिलांचा छळ केला जातो. मात्र, या पतींना अद्दल घडविणारा कायदा अस्तित्वात नव्हता. सुषमाजींनी व्यक्तिगत लक्ष घालून याबाबतचे विधेयक गेल्या लोकसभेत सादर केले. मात्र, त्याचे कायद्यात रूपांतर होणे अद्याप शक्य झालेले नाही. आयोगाला दिलेला शब्द सुषमाजींनी पाळला. अंबरनाथ येथील फरिदा खान ही मस्कतमध्ये मानवी तस्करीला बळी पडली होती. तिची तेथून सुटका करून तिला कुटुंबीयांपर्यंत पोहचविण्यात सुषमाजींनी कोणतीही कसर बाकी ठेवली नाही. अशा प्रकारच्या इतर प्रकरणांतही केवळ फोनवरून केलेल्या विनंतीच्या आधारे त्यांनी अनेकांना मदत केली आहे.



नवी दिल्ली येथे राज्य महिला आयोगाच्यावतीने मानवी तस्करी विरोधात राष्ट्रीय परिषदेवेळी प्रसन्न वातावरणात विजया रहाटकर यांनी सुषमा स्वराज यांचे स्वागत केले.



मस्कतमध्ये अडकलेल्या फरिदा खान हिच्याशी सुषमाजींनी अत्यंत आपुलकीने संवाद साधला.



सुषमाजींचे स्वागत करताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.




आयोगाने प्रकाशित केलेल्या विविध कायदेविषयक पुस्तक संचाचे प्रकाशन करताना सुषमाजी.

# तिहेरी तलाक इतिहासजमा

## अखेर कायदा अस्तित्वात



**नवी दिल्ली :** मुस्लिम महिलांना केवळ तोंडी तीन वेळा तलाक म्हणून सोडचिठ्ठी देण्याची कुप्रथा असलेल्या तिहेरी तलाकला कायमचे हद्दपार करणारा कायदा अखेर संसदेने जुलै महिन्यात मंजूर केला. लोकसभेत २५ जुलैला ३०३ विरुद्ध ८२ अशा मतफरकांनी तिहेरी तलाविरोधी विधेयक मंजूर केले. हेच विधेयक राज्यसभेत ३० जुलैला मंजूर झाले. या विधेयकाच्या बाजूने ९९ मते पडली तर ८४ मते विरोधात पडली. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनीही या विधेयकावर स्वाक्षरी केल्यामुळे आता या विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाले आहे. १९ सप्टेंबरपासून हा कायदा लागू होणार आहे.

मुस्लिम महिला (लग्नासंबंधी हक्कांचे संरक्षण) विधेयक २०१९ नुसार 'तलाक, तलाक, तलाक' असं म्हणून घटस्फोट देणाऱ्या व्यक्तीला तीन वर्षापर्यंत शिक्षा देण्याची यात तरतूद आहे. राज्यसभेत भाजपकडे बहुमत नव्हते, पण नितीश कुमार यांच्या जद (यू) आणि तमिळनाडूतील अण्णा द्रमुक या पक्षांनी मतदानावर बहिष्कार घातल्यामुळे बहुमताचा आकडा कमी झाला. विरोधी पक्षांमधील मतभेदांचे दर्शन राज्यसभेत दिसले. काही विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मोक्याच्या क्षणी सभात्याग केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार आणि नेते प्रफुल पटेल अनुपस्थित होते. जनता दलाने (युनायटेड) तिहेरी तलाकच्या या विधेयकाला विरोध केला होता, पण पंतप्रधान मोदींनी त्यांच्याशी फोनवरून चर्चा केल्यानंतर त्यांचा विरोध मावळला. बिहारमधल्या पुरस्थितीवर चर्चा करण्यासाठी हा फोन करण्यात आला होता. जद(यु)ने जरी विरोध करत वॉकआऊट केला असला तरी मतदानाच्या वेळी बाहेर पडून त्यांनी भाजपला एकप्रकारे मदतच केली आहे. तृणमूल काँग्रेसने या विधेयकाला विरोध केला. कोर्टाने तिहेरी तलाकला बेकायदेशीर ठरवल्यानंतर या विधेयकाची गरज नाही, असं तृणमूलच्या सदस्यांचं म्हणणं होतं. सरकार या विधेयकाबाबत घाई का करत आहे, असा प्रश्नही त्यांनी विचारला. हे विधेयक चर्चेसाठी सिलेक्ट समितीकडे पाठवावं, अशी मागणी करण्यात आली. पण सत्ताधारी भाजपने संख्याबळाच्या जोरावर ही मागणी फेटाळून लावली. लोकसभेत २५ जुलै रोजी हे विधेयक मंजूर करण्यात आले होते. भाजपने यावरील मतदानासाठी व्हिप जारी केला होता, ज्यानुसार सर्व भाजप खासदारांना पक्षाची भूमिका स्वीकारणं अनिवार्य होतं.

**'देशासाठी ऐतिहासिक दिवस'**

पंतप्रधान मोदी यांनी हे विधेयक राज्यसभेत संमत झाल्यावर हे 'महिला सशक्तिकरणाच्या दिशेनं मोठं पाऊल' असल्याचं ट्विट करून म्हटलं आहे.

लांगूलचालनाच्या नावावर देशातील कोट्यवधी माताभगिनींना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्याचं पाप केलं गेलं. मला अभिमान आहे की मुस्लीम महिलांना त्यांचा हक्क आमच्या सरकारने दिला. या विधेयकाच्या बाजूने मतदान करणाऱ्या सर्व खासदारांचे मी आभार मानतो, असे ही मोंदी यांनी म्हटले आहे.

''गृहमंत्री अमित शहा यांनीही पंतप्रधान मोदी यांचं अभिनंदन केलं. ''आज लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे.''

''पंतप्रधान मोदी यांनी तिहेरी तलाकवर बंदी आणण्याचं आश्वासन दिलं होतं. त्यांनी आपला शब्द पाळला आणि मुस्लीम महिलांना या कुप्रथेतून मुक्त केलं आहे. या विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या सर्व पक्षांना धन्यवाद,'' असंही त्यांनी ट्वीट केलं. यावेळी शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी या विधेयकाच्या मंजुरीला माताभगिनींसाठी एक स्वातंत्र्योत्सव असल्याचं म्हटलं आहे. ''हा निर्णय देशातल्या बहुसंख्य मुस्लीम स्त्रियांना गुलामीतून मुक्त करणारा निर्णय आहे. गेल्या ७० वर्षांत जे झालं नाही ते पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात झालेलं आहे. मला वाटतं की गेली कित्येक वर्ष गुलामीच्या बेड्यांमध्ये अडकलेल्या मुसलमान माताभगिनींसाठी हा स्वातंत्र्योत्सव आहे. त्यांच्या आयुष्यात जणू काही ईदचा जश्न आला आहे.



**विरोधी कायदा बनविला. या देशात आपण जर सतीप्रथा संपवू शकतो, भ्रूणहत्या रोखण्यासाठी कायदा करू शकतो. बालविवाहांविरोधात आवाज उठवू शकतो. हुंड्याच्या प्रथेविरोधात कठोर पावले उचलू शकतो, तिहेरी तलाकविरोधात आवाज का उठवू नये?**

– **नरेंद्र मोंदी,** पंतप्रधान (स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात)

# तत्काळ तिहेरी तलाक आहे काय?



- ‘तत्काळ तिहेरी तलाक’ किंवा ‘तलाक-उल-बिद्दत’ची इस्लामिक प्रथा नवऱ्याला तीन वेळा तलाक म्हणून लग्न संपवण्याची सवलत देते.
- हा तलाक कोणत्याही प्रकारे कळवला जाऊ शकतो; तोंडी, टेक्स्ट मेसेजवर किंवा अगदी ई-मेल करूनही.
- या प्रथेवर बंदी घालण्यासाठी अनेक महिलांनी सुप्रीम कोर्टाला अर्ज, विनंत्या पाठवल्यानंतर, ऑगस्ट महिन्यात कोर्टाने ही प्रथा घटनाबाह्य ठरवली.
- भारतातल्या सुन्नी मुस्लिमांमध्ये तत्काळ तिहेरी तलाक देण्याची पद्धत रुढ आहे, असं असलं तरी सुन्नींमधले तीन पंथ ही प्रथा ग्राह्य मानत नाहीत. देवबंद- हा सुन्नी मुसलमानाचा चौथा पंथ एकमेव असा पंथ आहे जे ही प्रथा मानतात.

## भारतातले सर्व मुस्लीम तिहेरी तलाकची प्रथा पाळतात का?


- भारतातल्या मुसलमानांमध्ये ‘तत्काळ तिहेरी तलाक’चं प्रमाण किती आहे, याबद्दल अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. यासंदर्भात एक ऑनलाईन सर्व्हे झाला. याचा सँपल साईज अगदी कमी होता.
- पण या ऑनलाईन सर्व्हेनुसार मुस्लिमांपैकी केवळ एक टक्का लोकांनी या प्रकारचा तलाक घेतला होता.
- एखाद्या मुस्लीम पुरुषाने तलाक द्यायचा ठरवला तर त्याला ‘तलाक-उल-अहसान’ म्हणतात. हा तलाकची प्रक्रिया तीन महिने चालते, या काळात त्या जोडप्याला आपले मतभेद दूर करून समेट घडवून आणण्याची संधी मिळू शकते.

## कुराण कायद्याप्रमाणं तिहेरी तलाक कसा देतात?

- मुस्लीम महिलेलाही तलाक घेण्याचा अधिकार आहे, त्याला ‘खुला’ असं म्हणतात.
- पत्नीला तलाक हवा आहे पण पती तो देण्यास नकार देत असेल तर तिला काझीकडे जाऊन किंवा शरिया कोर्टात जाऊन घटस्फोट मिळवता येतो. अशा तलाकला फस्ख-ए-निकाह म्हणतात.
- आपल्या लग्नाच्या करारात म्हणजेच निकाहनाम्यातही घटस्फोटाच्या अटी ठरवण्याचा अधिकार महिलेला असतो. याला तफविध-ए-तलाक असं म्हणतात, घटस्फोटाचे अधिकार पत्नीकडे हस्तांतरित करणं असा त्याचा अर्थ होतो.


## तत्काळ तिहेरी तलाक कायद्यातील ठळक तरतुदी

- मुस्लीम महिला विवाह अधिकार संरक्षण विधेयकाने २०१७ तत्काळ तिहेरी तलाक देणे हा गुन्हा आहे.
- तोंडी, लेखी वा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील तिहेरी तलाकला लागू.
- तिहेरी तलाक देणाऱ्या पुरुषाला तीन वर्षांपर्यंत कैद.
- पतीला आर्थिक दंडाचीही तरतुद.
- या काळात पत्नीला पतीने भत्ता देण्याचीही तरतूद.
- मुलांचा ताबा पत्नीकडेच राहणार.
- तिहेरी तलाकचा गुन्हा अजामीनपात्र मात्र, सबळ कारण असल्यास न्यायाधीश जामीन देऊ शकतात.



राज्यसभेत मुस्लिम महिला विधेयक (प्रोटेक्शन ऑफ राइट्स ऑन मॅरेज) विधेयक मंजूर झाल्यामुळे तिहेरी तलाकची अन्यायकारी प्रथा बंद करण्याच्या प्रक्रियेवर संसदेची मोहोर उमटविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने ही ऐतिहासिक कामगिरी आहे. हा आनंदाचा क्षण आहे.

– **रामनाथ कोविंद,** राष्ट्रपती



देशभरातील मुस्लिम भगिनींना तिहेरी तलाकच्या शापापासून मुक्ती मिळाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या ऐतिहासिक निर्णयामुळे मुस्लिम महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. या महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या अधिकारांचे रक्षण या दृष्टीने उचलण्यात आलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. सरकारने मुस्लिम महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रदान केला आहे.

– **अमित शहा,** केंद्रीय गृहमंत्री



खरोखर, लक्षावधी मुस्लिम महिलांसाठी हा विजायाचा क्षण आहे. या सामाजिक क्रांतीचे नेतृत्व अग्रभागी राहून केल्याबद्दल पंतप्रधानांचे हार्दिक आभार. सबका साथ सबका विकासचे खरेखुरे प्रत्यंतर.

– **स्मृती इराणी,** केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री



ऐतिहासिक दिवस, देशासाठी ऐतिहासिक क्षण. राज्यसभेने तिहेरी तलाकविरोधी विधेयक मंजूर केल्यामुळे आमच्या बहिणींना न्याय मिळाला आहे. भारताचे अभिनंदन. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व संसद सदस्यांचे आभार. तिहेरी तलाकपासून मुक्ती मिळण्यासाठी आवाज उठविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचेही अभिनंदन.

– **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री



राज्यसभेने तिहेरी तलाकविरोधी विधेयक मंजूर केले, हा ऐतिहासिक दिवस आहे. आधी लोकसभेनेही ते मंजूर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने मुस्लिम महिलांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण केले. यापुढे तलाक तलाक तलाक नाही चालणार.

– **रविशंकर प्रसाद,** केंद्रीय कायदा मंत्री

# आठ कोटी मुस्लिम महिलांना न्याय

## तिहेरी तलाक बंदीवर विजया रहाटकर यांची प्रतिक्रिया

**मुंबई :** तिहेरी तलाकला बंदी घालणाऱ्या विधेयकाला अखेर राज्यसभेची मंजुरी ही ऐतिहासिक घटना आहे आणि त्यामुळे आठ कोटी मुस्लिम महिलांना न्याय मिळाला आहे. एका प्रतिगामी आणि महिलांचे शोषण करणाऱ्या प्रथेला मुठमाती मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि भाजप महिला मोर्च्याच्या राष्ट्रीय अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

लोकसभेमध्ये हे विधेयक तीनदा मंजूर होऊनही त्यावर राज्यसभेत मंजुरीची मोहोर उमटत नव्हती. सर्वोच्च न्यायालयाच्या महत्वपूर्ण निकालानंतरही तिहेरी तलाकच्या कुप्रथेचे समर्थन काही राजकीय पक्ष करीत होते. पण सुदैवाने आता राज्यसभेची मंजूरी मिळाल्याने तिहेरी तलाकवर बंदी येणार आहे. महिलांच्या शोषणांविरुद्ध हे निर्णायक पाऊल आहे. एका जोखडातून त्यांची मुक्तता झाली आहे. राजकीय इच्छाशक्ती दाखविल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आणि त्याचबरोबर सहकार्य करणाऱ्या सर्व पक्षांच्या खासदारांचे आभार मानते, असेही रहाटकर म्हणाल्या.

तिहेरी तलाकच्या मुद्द्यावर तीन वर्षांपूर्वी आपण पंतप्रधानांना हजारो मुस्लिम महिलांचे निवेदन दिले होते, असेही रहाटकर यांनी सांगितले.



**तिहेरी तलाक विरोधी विधयक राज्यसभेत मंजूर होणे ही ऐतिहासिक घटना आहे. या कायद्यामुळे ८ कोटी मुस्लिम भगिनींना न्याय, सन्मान आणि समानता मिळेल.**
**हा विजय आहे, मुस्लिम भगिनींच्या सन्मानाचा..**
**हा पराभव आहे, मुस्लिम भगिनींचे अधिकार हिरावणाऱ्यांचा...**

– **विजया रहाटकर,** अध्यक्ष राज्य महिला आयोग

# महिला आयोग स्वतःहून न्यायालयात जाणार

## गहुंजे बलात्कारप्रकरणी उच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करणार

**मुंबई :** फाशी देण्यातील दिरंगाईमुळे पुण्यातील गहुंजे सामूहिक बलात्कार व खून प्रकरणातील दोन आरोपींची फाशी रद्द करून जन्मठेप देण्याप्रकरणी स्वतःहून न्यायालयीन लढाई लढण्याचा (ज्युडीशियल इंटरव्हेंशन) निर्णय महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने घेतला आहे. मुंबई उच्च न्यायालयात फेरविचार याचिका अथवा गरजेनुसार सर्वोच्च न्यायालयात या निकालाला आव्हान देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ही माहिती दिली. "उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने फाशी कायम ठेवली आणि मा.राष्ट्रपतींनीही दयेचा अर्ज फेटाळला होता. तरीही दोषी पुरुषोत्तम बोराटे आणि प्रदीप कोकडे यांना फाशी देण्यात दिरंगाई झाली. मात्र या कारणावरून त्यांची फाशी रद्द करून जन्मठेप देण्याच्या मा.उच्च न्यायालयाच्या निकालाशी आम्ही असहमत आहोत. दिरंगाई या एकाच कारणाने दोषींच्या क्रौयाला फाशीची शिक्षा दिली जाणार नाही, हे अनाकलनीय आहे. सामूहिक बलात्कार व खूनाला बळी पडलेल्या ज्योतीकुमारी चौधरी हिला न्याय नाकारण्यासारखेच आहे. म्हणून याप्रकरणी आयोगाने न्यायालयीन लढाईत स्वतःहून भाग घेण्याचा निर्णय घेतला आहे," असे अध्यक्षा रहाटकर यांनी सांगितले.

दिरंगाई का झाली?कोणी केली? याची सखोल चौकशी करण्याची सूचनाही त्यांनी राज्य सरकारला केली. त्याचबरोबर राज्य सरकारने या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

महिलांविषयक प्रश्नांवर आयोग नेहमीच सक्रीय आणि सकारात्मक भूमिका घेत आलेला आहे. अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर आयोगाने न्यायालयाचे दरवाजे वेळोवेळी ठोठावले आहेत. ज्योतीकुमारी चौधरी हिच्या मारेकऱ्यांना केवळ शिक्षेच्या अंमलबजावणीतील दिरंगाईमुळे फाशी होत नाही, हे मान्य नसल्यानेच आयोगाने स्वतःहून न्यायालयीन लढ्याचे पाउल उचलले आहे.

# बचत गटांसाठी नवे पाऊल
# प्रज्ज्वला...

## ध्यास सर्वांगीण सक्षमीकरणाचा

- समाजात महिलांचे स्थान उंचावणे, हे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे मुख्य ध्येय; तर महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण हा ध्यास!
- सर्वच सक्षमीकरणाचा पाया असतो ते आर्थिक स्वावलंबन... स्वतःच्या पायावर उभे राहणे.
- म्हणून आयोगाने आर्थिक सक्षमीकरणावर सर्वाधिक भर दिलेला आहे.

*म्हणून बचत गट महत्वाचे...*

- बचत गटांना ताकत दिल्याशिवाय आर्थिक सक्षमीकरण होऊच शकत नाही.

*त्यासाठी बचत गट महत्वाचे...*

- राज्यात सुमारे तीन लाख बचत गट आणि त्यात सहभागी असलेल्यांची संख्या सुमारे ६० लाख. म्हणजे राज्यातील १४ टक्के महिला बचत गटांशी जोडलेल्या
- ही संख्या लक्षणीय; पण अन्य राज्यांच्या तुलनेत फारच कमी. उदा. तेलंगणा ५० टक्के, आंध्र ४० टक्के, केरळ २८ टक्के, कर्नाटक-तमिळनाडूमध्ये १७ टक्के महिला बचत गटांशी जोडलेल्या.

## 'प्रज्वला'...नवे पाऊल

- थोडक्यात बचत गटांमध्ये प्रचंड काम करण्याची संधी उपलब्ध
- म्हणूनच नियोजन विभाग आणि ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने बचत गटांसाठी नवी योजना आणण्याचे ठरविले आहे.
- तिचे नाव असेल 'प्रज्ज्वला'... स्वतःच्या पायावर उभी राहण्यासाठी प्रज्ज्वलित झालेली प्रज्ज्वला..!

## 'प्रज्वला'ची उद्दिष्टे...

- बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण हे मुख्य उद्दिष्ट
- त्यासाठी व्यावसायिक कौशल्ये वाढविण्यास मदत करणे, उत्पादित वस्तूंचे ब्रँडिंग करण्यास मदत करणे
- महत्वाचे म्हणजे उत्पादनांच्या विक्रीसाठी स्थायी व्यवस्था उभी करणे

## टप्पा पहिला कार्यशाळांचा

- 'प्रज्वला' ही योजना तीन टप्प्यांत राबविली जाईल.
- पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्व विधानसभा क्षेत्रामध्ये बचत गटांसाठी एक दिवशीय कार्यशाळा घेतली जाईल.
- सरकारी योजनांची माहिती ते मार्केटिंग-व्यवस्थापन कौशल्यांचे प्रशिक्षण असे त्याचे स्वरूप असेल.
- या कार्यशाळा ऑगस्ट २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असेल.

## टप्पा दुसरा क्लस्टरचा...

- दुसऱ्या टप्प्यांमध्ये बचत गटांचे क्लस्टर तयार केले जातील.
- एक जिल्हा, एक वस्तू असे त्या क्लस्टरचे वैशिष्ठ असेल.
- या टप्प्यामध्ये प्रारंभिक बारा जिल्हे समाविष्ठ असतील. ते पुढीलप्रमाणे-पालघर, नगर, सांगली, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, लातूर, जालना, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती.

## टप्पा तिसरा बचत गट बाजारांचा...

- या टप्प्यात बचत गट बाजार बांधण्याचे नियोजन आहे.
- हे बचत गट बाजारदेखील वर उल्लेख केलेल्या प्रारंभिक बारा जिल्ह्यांमध्येच उभे केले जातील.
- या बचत गट बाजारांची रचना एकसमान असेल. त्याचे डिझाईन महिला आयोगाकडून उपलब्ध करून दिले जाईल.

## प्रज्ज्वला योजनेचे प्रशिक्षण सध्या राज्यभर सुरू आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांची सचित्र माहिती

# लातूर जिल्ह्यात दोन दिवस प्रशिक्षण

**मुंबई :** राज्यभरातील महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'प्रज्वला' योजना राबविण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील प्रशिक्षण कार्यक्रम दि.०५.०८.२०१९ व दि.०६.०८.२०१९ रोजी लातूर, औसा, निलंगा, उदगीर, अहमदपूर, रेनापूर येथे होणार आहेत. लातूर जिल्ह्यातील प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

'राज्यामध्ये सुमारे ३ लाख बचत गट असून त्यांच्याशी सुमारे साठ लाख महिला जोडलेल्या आहेत. हे बचत गट आर्थिक सक्षमीकरणाचा कणा असल्याने आयोगाने बचत गटांना आणखी सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्यातून प्रज्वला योजना आकारास आली आहे. प्रज्वला योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येत असून दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तू' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी 'बचत गट बाजार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्याचे नियोजन आहे',' अशी माहिती आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.

या योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि महिला व बाल कल्याण मंत्री पंकजा मुंडे यांचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले. आतापर्यंत प्रज्वला प्रशिक्षण कार्यक्रम नंदुरबार, धुळे, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, अहमदनगर, नांदेड, परभणी, जळगाव, अकोला, वाशीम, पालघर, भंडारा या जिल्ह्यात झाले आहे.

## साद दे, साथ घे - प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद दे, साथ घे, अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# प्रज्ज्वला योजनेचे प्रशिक्षण सध्या राज्यभर सुरू आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांची सचित्र माहिती

## निलंगा, जि. लातूर

येथे झालेल्या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री संभाजी पाटील-निलंगेकर यांची विशेष उपस्थिती होती. जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या सदस्यांनी या प्रशिक्षणात उत्साहाने आणि उत्स्फूर्तपणे भाग घेतला.









## औसा, जि. लातूर

येथे झालेल्या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री संभाजी पाटील-निलंगेकर, मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक अभिमन्यू पवार यांची विशेष उपस्थिती होती.







## लातूर शहर

**येथे झालेल्या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, लातूरचे महापौर सुरेश पवार यांची विशेष उपस्थिती होती.**









## भंडारा व गोंदिया जिल्हा

भंडारा, तुमसर, साकोली, अर्जुनी, तिरोरा, गोंदिया आणि आमगाव येथे झालेल्या प्रशिक्षणास उत्तम प्रतिसाद मिळाला. अर्चना डेहणकर, वनिता कानडे, नीता ठाकरे आदींनी दिलेल्या प्रशिक्षणाचा खूप फायदा झाला.









## मुक्ताईनगर, जि. जळगाव

राज्यातील महिलांच्या हिताकरिता कार्य करणारे महाराष्ट्र महिला आयोग एका पाठोपाठ कल्पक व तितकेच हितकारी उपक्रम स्त्रीशक्तीच्या जागरणासाठी राज्यभर राबवित आहे. 'प्रज्ज्वला' प्रशिक्षण शिबिरातून बचत गटांच्या महिलांसाठी सरकारी योजना, स्त्रियांच्या संरक्षणासाठी कायद्यांचा आधार व माहिती तसेच सबलीकरणासाठी विविध उपक्रम याबाबत सोप्या भाषेत सजग केले जात आहे. जळगाव, भुसावळ व मुक्ताईनगर येथे भरगच्च उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.







## जळगाव जिल्हा

जळगाव जिल्ह्यात तीन दिवसांत अध्यक्ष विजया रहाटकर यांनी आठ कार्यक्रम विविध ठिकाणी घेऊन महिला बचत गटांच्या सदस्यांमध्ये 'प्रज्ज्वला' योजनेविषयी जनजागृती केली. या कार्यक्रमांना महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जामनेर येथील कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, देवयानी ठाकरे आदी उपस्थित होते.













## भुसावळ (जि. जळगाव)

**‘प्रज्वला योजना तीन गटात विभागली गेली असून पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण, दुसऱ्यात एक जिल्हा एक वस्तूंचे क्लस्टर आणि तिसऱ्या टप्प्यात बचत गट बाजाराची उभारणी करण्यात येणार आहे.’**












## जळगाव

"आजच्या महिला या दुर्गा, सरस्वती व लक्ष्मीचा अवतार असून याच घराच्या खऱ्या अर्थाने भाग्यविधाता आहेत. विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी कंबर कसा. परिवारासह समाज समृद्ध होण्यासाठी प्रयत्न करा," असे आवाहन राज्य आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी जळगावातील कार्यक्रमात केले.



## अमळनेर (जि. जळगाव)










## चाळीसगाव (जि. जळगाव)



*''तुम्ही घडवित आहात
क्षमतांचा सर्वोच्च आविष्कार
तुम्ही दाखवून देत आहात
स्वबळावर हिमतीने लढण्याची ताकद
तुम्ही दाखवित आहात बचतीतून एकजूट
आणि एकजूटीतून शक्ती''*

**अशा शब्दांत महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी बचत गटातील महिला सदस्यांना साद घातली.**




## विक्रमगड (जि. पालघर)

**'पालघर जिल्हा आदिवासीबहुल आहे,पण इथल्या महिलांकडील कलाकुसर मोलाची आहे. प्रज्ज्वलाच्या दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा,एक वस्तू'चे क्लस्टर्स असतील. त्याची सुरुवात पालघरपासून करू,' असे महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी विक्रमगड येथे सांगितले.**





# महिलांविषयक धोरण राबविणारे महाराष्ट्र एकमेव राज्य : रहाटकर

**पिंपरी :** महिलांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायदे तयार केले असून त्याकायदया अंतर्गतचे फायदे शेवटच्या घटकापर्यंत पोहचवायचे काम महाराष्ट्र राज्य महिला आयोग करत असून संपूर्ण भारतात महिलांविषयक धोरण राबविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, असे प्रतिपादन महाराट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या वतीने आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकारामनगर, पिंपरी येथे महिला सक्षमीकरण अंतर्गत महिला बचत गटांसाठीच्या प्रज्वल योजना प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महापौर राहूल जाधव, आमदार लक्ष्मण जगताप, सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार,स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी, विरोधी पक्षनेते दत्तात्रय साने, आयुक्त श्रावण हर्डीकर, महिला व बालकल्याण समिती सभापती निर्मला कुटे, विधी समिती सभापती अश्विनी बोबडे, जैव विविधता व्यवस्थापन समिती अध्यक्षा उषा मुंढे, 'अ' प्रभाग अध्यक्षा शर्मिला बाबर, 'क' प्रभागअध्यक्षा यशोदा बोईनवाड, 'ई' प्रभाग अध्यक्षा सुवर्णा बुर्डे, 'फ' प्रभाग अध्यक्षा योगिता नागरगोजे, अतिरिक्त आयुक्त संतोष पाटील नगरसदस्या, स्विनल म्हेत्रे, अश्विनी जाधव, अनुराधा गोरखे,सुजाता पालांडे, सोनाली गव्हाणे, प्रियांका बारसे, साधना मळेकर, नगरसदस्य नामदेव ढाके,राजेंद्र गावडे, सहाय्यकआयुक्त स्मिता झगडे, अण्णा बोदडे, समाज विकास अधिकारी संभाजी ऐवले आदी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या, राज्य महिला आयोग हे महिलांचे जीवनमान उंचावण्याचे काम करीत आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी जे कायदे तयार केले आहेत ते शेवटच्या घटकापर्यत पोहचवायचे आहेत. महिलांचे बचत गट ही खूप चांगली चळवळ आहे. प्रज्वल योजनेत महिलांविषयक कायदे व बतच गटाच्या योजनांची माहिती दिली जाते.

पक्षनेते एकनाथ पवार म्हणाले, पिंपरी चिंचवड महनगरपालिकेच्या माध्यमातून बचतगटांच्या उन्तीसाठी ५० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. महिलांना स्वावलंबी सक्षम करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्न करीत आहे. आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले, शहरात १५ हजारोंपेक्षा जास्त बचतगट स्थापन झाले आहेत. आपल्या कुटूबांला संपन्न बनविण्याची क्षमता महिलांमध्ये असते. महिला बचत गटांनायोग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.यावेळी शलाका साळवी व मिनल मोहाडीकर यांनी योजना व कायदे याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन बी. के. कोकाटे यांनी केले तर आभार  सहाय्यक आयुक्त स्मिता झगडे यांनी मानले.

**सौजन्य : लोकमत**



# प्रज्ज्वला योजनेंतर्गत बचत गटांचे प्रशिक्षण उत्साहात

**वाशिम :** महिलांना स्वावलंबी व सक्षम बनविण्यासाठी राज्य शासनाने प्रज्ज्वला योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून महिला बचत गटांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत बचत गटांच्या माध्यमातून उद्योग उभारून महिलांना उद्योगिनी बनण्यास मदत केली जाणार आहे. महिलांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन आमदार राजेंद्र पाटणी यांनी केले. राज्य महिला आयोग व राज्य शासन यांच्यावतीने आज स्वागत लॉन येथे आयोजित प्रज्ज्वला योजनेंतर्गत बचत गटांचे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी प्रज्ज्वला समिती सदस्य उषा वाजपेयी, अर्चना डेहनकर, सामाजिक कार्यकर्त्या जयश्री देशमुख, नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक विजय खंडरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक संचालक प्रांजली बारस्कर, प्रभारी गट विकास अधिकारी डॉ. निलेश वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. पाटणी म्हणाले, महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध योजना राबवीत आहे. उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत अभियान ही त्याचीच उदाहरणे आहेत. आता राज्य शासनाने महाराष्ट्राला धुरमुक्त करण्याचा निर्णय घेतला असून उज्ज्वला योजनेचा लाभ न मिळालेल्या महिलेला या योजनेतून गॅस जोडणी दिली जाणार आहे. मुलगी शिकली तर कुटुंबाची आणि देशाची प्रगती होईल, त्यामुळे बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनाही केंद्र शासनाने सुरु केली आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून छोटे-छोटे उद्योग उभारून महिलांना उद्योगिनी बनविण्यासाठी प्रज्ज्वला योजनेच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. या योजनेचा लाभ घेवून महिलांनी आपला बचत गट सक्षम बनवावा. कुटुंब आणि देश घडविण्याचे काम महिलाच करू शकते, त्यामुळे महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच वाशिम व कारंजा येथे बचत गटांसाठी भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीमती वाजपेयी म्हणाल्या, बचत गटांतील महिलांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी प्रज्ज्वला योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिलांना उद्योगिनी बनवून स्वयंपूर्ण बनविण्यासाठी या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात तालुकास्तरावर प्रशिक्षण घेवून विविध योजनांची माहिती बचत गटातील महिलांना देण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तु' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहे. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी 'बचत गट बाजार'उभारण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच केंद्र व राज्य शासनामार्फत महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली.

श्रीमती डेहनकर म्हणाल्या, विजया रहाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून प्रथमच प्रज्ज्वला योजनेंतर्गत महिला बचत गटांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे महिलांना विविध कायदे, केंद्र व राज्य शासन महिलांसाठी राबवीत असलेल्या विविध योजनांची माहिती घेवून लाभ घेता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'उमेद'च्या बचत गटांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या 'अस्मिता' योजनेची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी श्री. खंडरे यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी महिलांना केलेल्या आवाहनाची ध्वनिचित्रफित यावेळी दाखविण्यात आली. तसेच आयोगाने प्रकाशित केलेल्या सखी संवाद, कायदे तुमच्यासाठी,प्रज्ज्वला यापुस्तिकांचे वाटप बचत गटाच्या महिलांना करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. वानखडे यांनी केले. तर सूत्रसंचालन उज्ज्वला मोरे यांनी केले. कार्यक्रमाला तालुक्यातील बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.






## अकोला





## डहाणू (जि. पालघर)

''महिलांचे सक्षमीकरण झाल्याशिवाय राज्य, देश समृद्ध होणार नाही. शासन तुमच्या पाठीशी आहे. बचत गटांना ताकत दिली जात आहे. याचा लाभ घ्या आणि देशाच्या विकासाला हातभार लावा,'' असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी डहाणू येथील प्रशिक्षण कार्यक्रमात केले.







## राहुरी (जि. नगर)

''माझ्या मैत्रिणींनो, या गरीब, ग्रामीण, अर्धशिक्षीत बाया-बापड्या पैसा कसा गोळा करणार? त्यातून स्वयंरोजगार कसा मिळवणार? अशा शंकाकुशंकांना, तुमच्यावर अविश्वास दाखविणाऱ्या सर्वांनाच तुम्ही अपार मेहनतीने बचत गटांना यशस्वी करून जबरदस्त प्रत्युत्तर दिलेत, याबद्दल मी सर्वप्रथम तुमचे अगदी आभार मानते! अभिनंदन करते!! आणि हो, तुमच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमानही बाळगते,'' असे अध्यक्ष विजया रहाटकर कार्यक्रमात म्हणाल्या.



## मुखेड (जि. नांदेड)

मुखेड येथील प्रशिक्षण कार्यक्रमात आमदार डॉ. तुषार राठोड, दीपाली मोकाशे, नईम कुरेशी (प्रकल्प संचालक नांदेड मनपा), साधना सुराडकर, ॲड. माधुरी अदवंत आणि भारती पाटील उपस्थित होते.



# ताणनिवारणाची चतु:सूत्री





**घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. त्यावर मात करण्यासाठी चतु:सूत्री उपयुक्त ठरेल.**

**डॉ. राजेंद्र कंटक,**
१३, दौलत कॉलनी, मार्केट यार्ड, कऱ्हाड, जि. सातारा, ९८८१४४३२४३

घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण-तणाव हा जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. त्याची कारणे, प्रकार आपण पाहिलेच. त्यावर मात कशी करायची याविषयी आपण पाहू.

जसजशी प्रगती होत आहे, तशा माणसाच्या अपेक्षा वाढत आहेत. अपेक्षा वाढणे याचाच अर्थ असमाधानी असणे. हेच असमाधान ताण-तणाव वाढविण्यासाठी कारणीभूत ठरते. याचा अर्थ अपेक्षा ठेवायच्याच नाहीत, असा नाही, परंतु प्रत्येक अपेक्षापूर्तीचा अट्टहास सोडला पाहिजे. अपेक्षापूर्ती करताना आपण जे प्रयत्न करतो, त्यात सुद्धा असा आनंद घ्यावा की त्यातून वेगळेच समाधान मिळू शकेल, किंवा त्या प्रयत्नांत प्रगतीसाठी एखादा नवा मार्ग सापडेल. कुटुंब, शाळा, नोकरी, समाज येथे कोठेही, कोणतेही काम करताना त्या कामाचा मनापासून आनंद घ्या. मनापासून केल्यामुळे काम योग्य प्रकारे होतेच, आणि कामाचे अपेक्षित फळ मिळाले नाही तरीही काम करण्यातील आनंद मिळतो.

अगदी एखादा खेळ खेळतानासुद्धा आपण मनापासून आनंद घेत असू तर जिंकलो नाही किंवा खेळताना पडलो, लागले तरी त्याचे जास्त दु:ख होत नाही. कारण, ते दु:ख आनंदात वाहून गेलेले असते. म्हणूनच...

१ ) कोणतेही छोटे-मोठे काम आनंदाने करा.


२.) आपला संपर्क जितका अधिक तितका ताणृताणव कमी असतो. मानसिक सुरक्षितता वाढविण्याचे काम संपर्कामुळे होते. उदा. आपण गावाला गेलो असू आणि घरी काही अडचण आल्यास आपले ज्यांच्याशी चांगले संबंध असतात, ज्यांना आपण मदत केलेली असते, असे लोक आपण बोलावण्याची वाट न पाहता मदतीसाठी धावून येतात. म्हणजेच, आपल्यावरील ताण कमी होतो. संपर्कामुळे अनेक नवनवीन गोष्टी कळतात. व्यवसायवाढीसाठीही त्याचा फायदा होतो.

३.) ताण-तणाव कमी करण्यासाठी संपर्काबरोबरच सुसंवादही गरजेचा असतो. एखाद्या व्यक्तीबरोबर संवाद साधण्याने तिच्याविषयी आपुलकी वाढते. त्यातून सुख-दु:खाच्या गोष्टींची देवाणघेवाण होऊन मन



हलके होते. सध्या मन हलके करण्यासाठी आपली म्हणावी, अशी व्यक्ती सापडत नाही. त्याला कारण म्हणजे माणूस आज फक्त पैशाच्या मागे, सुखामागे धावत आहे. पूर्वीची वाडा संस्कृती जाऊन फ्लॅट संस्कृती आली. तसेच, घरात एक किंवा दोन मुले, आई-वडील कामानिमित्त दिवसभर बाहेर. त्यामुळे पालक-मुलांमध्ये जास्त संवाद नाही. अभ्यासाची चढाओढ असल्यामुळे मुलांना मैदानी खेळणे माहितीच नाही. त्यामुळे मोबाइल किंवा टीव्ही ही मनोरंजनाची साधने मुलांना जवळची वाटतात. त्यामुळे मित्र-मैत्रिणीही कमीच असतात. इतकेच काय, नातेवाइकांबरोबरचा संवादही कमी होत चालल्याने मुलांना नातीही समजत नाहीत. त्यामुळे नात्यातील प्रेमही कमी झाले आहे. एकदा प्रयोग म्हणून मी १०० मुलांना निबंधासाठी आत्या, मावशी व काकी या तीन व्यक्तींवर निबंध लिहिण्यास सांगितले. ९८ मुलांनी मावशी आणि २ मुलांनी आत्यावर निबंध लिहिला. काकी या व्यक्तीवर कोणीच निबंध लिहिला नाही. काकी म्हणजे वडिलांच्या भावाची बायको. आडनावही एकच तरीही एकाही मुलाने काकीवर निबंध लिहिला नाही. याचा अर्थ असा की, रक्ताच्या नात्यात आपुलकी, प्रेम कमी झाले आहे. संवादाचा अभाव हेच हे प्रेम कमी होण्यामागील कारण आहे.

४) विनोदबुद्धी - संवाद असेल तरीही नात्यांत आपुलकी, प्रेम असेलच, असे म्हणता येत नाही. त्याचे कारण असे की, संवाद साधताना एखादा चुकीचा शब्द गेल्यास नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो. मग संवाद कसा साधायचा असा प्रश्न पडतो. संवाद साधताना मोकळ्या मनाने निःस्वार्थीपणे साधावा. शक्यतो, दुसऱ्यायाचे मन दुखावेल, असे शब्द कटाक्षाने टाळावेत. इतकी काळजी घेऊनही दुखावणारे शब्द संवादात जाऊ शकतात. यावर उपाय म्हणजे विनोदबुद्धी. आजकाल मुलांना विनोद कमी कळतो. कारण हल्ली तोंडावर विनोद करणारे आणि विनोद कळणारे दोघेही कमी आढळतात. कारण, विनोद कितीही हसण्याजोगा असला तरी तो सांगणी व्यक्ती नसते, तर मोबाइल असतो. हास्यासाठी सुद्धा इमोजी पाठवल्या जातात. त्यामुळेच माणूस हास्य विसरला आहे. हास्याचे फायदे जाणीवपूर्वर सांगावे लागत असल्यामुळे हास्य क्लबना गर्दी होऊ लागली आहे. हास्य क्लबमधील हास्य अनैसर्गिक, ओढूनताणून आणलेले असते. ताण-तणाव कमी करण्यासाठी विनोदबुद्धी कायम जागृत ठेवली पाहिजे. जेणेकरून, एखादा जाणाचा विषयही विनोदाने आपण दूर ठेवू शकतो. उदा. लहान मुले जेवताना ताटातील अन्न खाली सांडतात. तेव्हा सर्वांसमोर त्यांना बोलल्यास त्यांचा अपमान होतो. त्यामुळे फक्त एवढेच म्हणावे की, आमचे बाळ जमिनीला खाऊ घालत आहे. त्यामुळे त्यांचा अपमानही होणार नाही आणि मनही दुखावणार नाही. बाळाला चुकीची जाणीव होऊन ते अन्न खाली सांडणार नाही. ताण-तणावग्रस्त असणाऱ्यांना समुपदेशन करताना मी अधूनमधून विनोद करतो. त्यामुळे एखादा कठोर शब्द वापरला तरी समोरचा तो हसत-खेळत स्वीकारतो. समुपदेशन योग्य प्रकारे सुरू असल्याची ती पावती असते. उदा. माझ्याकडे एक आजी अंगदुखी, रक्तदाब वगैरेच्या गोळ्या तपासणीसाठी आल्या होत्या. बोलता बोलता त्या एकदम म्हणाल्या, एखादी मरायची गोळी असेल तर मला दे बाबा. त्यांच्या या वाक्याचा मलाही राग आला पण मी त्यांना म्हणालो की आजी अशी गोळी असती तर मी आधी घेतली नसती का? या वाक्याने आजींच्या डोळ्यांत एकदम पाणी आले. त्या म्हणाल्या, पोरा, परत असं बोलू नको. मग पुढचा संवाद अगदी हसत-खेळत झाला. लहान मुले असोत की वृद्ध विनोद सर्वांवर परिणामकारक ठरतो.



अर्थभान

# एस. आय. पी : गुंतवणुकीचा स्मार्ट पर्याय



**आपल्या उत्पन्नामधून आवश्यक खर्च वजा करता दरमहा आपण किती रक्कम गुंतवू शकतो याचा अंदाज घेऊन त्यानुसार एस.आय.पी ची रक्कम ठरवायची. निरनिराळ्या आर्थिक उद्दिष्टांसाठी निरनिराळी एस.आय.पी. केल्यास आर्थिक नियोजन करणे अधिक सुलभ होते.**

**शैलेश गद्रे**, support@gkfinsol.com, ९९३०८४७३३४

**शब्दांकन : ऋजुता बापट-काणे**

मागील लेखामध्ये आपण म्युच्युअल फंडाच्या विविध प्रकारांबद्दल माहिती घेतली. या लेखामध्ये आपण म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणुक करण्याचा स्मार्ट पर्याय, एस.आय.पी. बद्दल माहिती घेऊया.

## एस.आय.पी :

आजकाल एस. आय. पी. हा जणू काही परवलीचा शब्द बनला आहे. खरंच काय बरं आहे हा एस.आय.पी प्रकार? आजकाल सर्वत्र जाहिरातींमध्ये, सोशल मिडीयावर, वर्तमानपत्रांमधून हा एस.आय.पी. किंवा सिप शब्द वारंवार आपल्या कानावर पडत असतो. 'कानामागून आली आणि तिखट झाली' असं काहीसं या एस.आय.पी योजनेबद्दल म्हणता येईल.

चला तर मग जाणून घेऊया एस.आय.पी. म्हणजे नक्की काय?

एस.आय.पी. म्हणजे सिस्टिमटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन.

शिस्तबद्ध रीतीने नियमितपणे म्युच्युअल फंडामध्ये केलेल्या गुंतवणुकीला एस.आय.पी. असे म्हणतात.

बँकांमधील किंवा पोस्ट ऑफिसमधील आवर्ती ठेव (आर.डी.- रिकरिंग डिपॉझिट) या योजनेबद्दल आपल्या सर्वांना माहिती आहेच. त्याचप्रमाणे म्युच्युअल फंडातील विविध योजनांमध्ये आपण दरमहा एक ठरावीक रक्कमेची गुंतवणूक करू शकतो. हा आर.डी.सारखाच प्रकार आहे, पण यात जमा झालेली रक्कम म्युच्युअल फंडसच्या माध्यमातून शेअर्स, रोखे (बाँडस) आणि इतर मनी इंस्ट्रुमेंटसमध्ये गुंतवणूक केली जाऊ शकते.

एस. आय. पी. मध्ये गुंतवणूकदाराने निवडलेल्या म्युच्युअल फंड योजनेमध्ये नियमितरीत्या, एकसारखी रक्कम गुंतवली जाते. नियमित गुंतवणूक करण्याचा हा एक उतम पर्याय असूनगुंतवणुकीमधील सातत्य आणि शिस्त हा एस.आय.पी. योजनेचा सर्वांत मोठा फायदा आहे.

आता आपण पाहू या की एस.आय.पी. पद्धतीने नक्की कशा प्रकारे गुंतवणूक केली जाते?

म्युच्युअल फंड खरेदी करण्यासाठी आपण म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करतो तेव्हा आपण त्या फंडाचे युनिट्स विकत घेत असतो. आधी सांगितल्याप्रमाणे आपण कोणत्याही प्रकारच्या शेअर्स किंवा बाँडसच्या खरेदी विक्रीमध्ये थेटपणे सहभागी होत नाही तर आपल्यासाठी हा व्यवहार म्युच्युअल फंड व्यवस्थापकाद्वारे केला जातो. या सर्व व्यवहाराचे फलित म्हणजे नेट ॲसेट व्हॅल्यू (एन.ए.व्ही.) ही त्या म्युच्युअल फंडचे (प्रत्येक युनिटमागे) बाजारमूल्य दर्शवत असते. उदाहरणार्थ, एखाद्या म्युच्युअल फंडमध्ये आपण १० हजार रुपये गुंतवले आणि त्यावेळी त्याची एन.ए.व्ही १० असेल तर आपल्याला १००० युनिट्स मिळतात. समजा, ४ महिन्यांनी त्या फंडाची एन.ए.व्ही १२ झाली तर फंडाची एकूण रक्कम १२००० होते. म्हणजे याठिकाणी २००० रुपये लाभ मिळाला.

## उदाहरण १

प्रत्यक्ष उदाहरणाद्वारे ही बाब आपण समजून घेऊ. समजा आपण ६०,००० रुपये एकरकमी गुंतवले आणि १० एन.ए.व्ही. ने ६००० युनिटस खरेदी केले. एक वर्षानंतर काही कारणास्तव एन.ए.व्ही. ९ झाली तर आपल्याला ६००० रुपये घट झालेली दिसून येईल. समजा जर आपण ५००० रुपये प्रतिमहिना एस.आय.पी. पद्धतीने गुंतवले तर एन.ए.व्ही.च्या चढ-उतारामधली जोखीम दर महिन्याला विभागली गेल्यामुळे होणारी घट निश्चितपणे कमी असते आणि याचा निश्चितपणे गुंतवणूकदाराला फायदा होतो. यालाच सरासरीचा नियम (लॉ ऑफ ॲव्हरेजिंग) असे म्हणतात. एस.आय.पी च्या माध्यमातून जेव्हा आपण दीर्घकालीन गुंतवणूक करतो तेव्हा निश्चितच त्याचा परतावा उत्तम असतो. गेल्या अनेक वर्षांच्या म्युच्युअल फंडसच्या कामगिरीवरून ही बाब ठळकपणे वारंवार सिद्ध आली आहे.

## उदाहरण २

एस.आय.पी. चालू करताना दोन पद्धतीने आपण गुंतवणुकीची रक्कम ठरवू शकतो. एक म्हणजे आपल्या आर्थिक उद्दिष्टानुसार किती वर्षांनी आपल्याला किती रक्कम मिळणं अपेक्षित आहे याचा ढोबळमानानं अंदाज घ्यायचा. ज्या फंडामध्ये गुंतवणुक करणार आहोत त्याचा परताव्याचा मागील इतिहास (पास्ट हिस्ट्री) पाहून सरासरी किती फायदा मिळू शकेल याचा अंदाज घ्यायचा आणि त्यानुसार गुंतवणुकीची रक्कम ठरवायची.

किंवा आपल्या उत्पन्नामधून आवश्यक खर्च वजा करता दरमहा आपण किती रक्कम गुंतवू शकतो याचा अंदाज घेऊन त्यानुसार एस.आय.पी ची रक्कम ठरवायची. निरनिराळ्या आर्थिक उद्दिष्टांसाठी निरनिराळी एस.आय.पी. केल्यास



आर्थिक नियोजन करणे अधिक सुलभ होते.

आता सर्वांत महत्त्वाचा मुद्दा येतो, तो म्हणजे कोणत्या फंडामध्ये गुंतवणूक करायची?

म्युच्युअल फंडाची निवड करताना आपले आर्थिक उद्दिष्ट, गुंतवणुकीचा कालावधी, गुंतवणूकदाराची जोखीम स्वीकारण्याची क्षमता, गुंतवणूकदाराचे वय आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे त्या फंडचा परताव्याचा इतिहास या सर्व निकषांचा विचार करणे आवश्यक असते. अशा वेळी गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूक मार्गदर्शकाचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक ठरते. कारण त्यांनी बाजारातील चढ-उताराचा, विविध प्रकारच्या म्युच्युअल फंडांचा, त्यामधून मिळणाऱ्या परताव्याचा सखोल अभ्यास केलेला असतो.

एस. आय. पी. किंवा सिप मध्ये गुंतवणूकदार त्याच्या आर्थिक उद्दिष्टानुसार सुयोग्य योजनेची निवड करून दर महिन्याला किती रक्कमेची गुंतवणूक करायची ते ठरवून ईसीएस/ऑटो डेबिट पद्धतीने किंवा पोस्ट डेटेड चेक देऊन गुंतवणूक करू शकतो. गुंतवणूकदार आपल्या गरजेनुसार आणि आर्थिक उद्दिष्टानुसार गुंतवणुकीची मुदत ठरवू शकतो.आपल्या इच्छेनुसार एस.आय.पी ची रक्कम वाढवू शकतो किंवा कमी करू शकतो. गुंतवणुकदार आवश्यकताभासल्यास संपूर्ण किंवा आंशिक रक्कम काढू शकतो किंवा योजना बंदही करू शकतो. एस.आय.पी. मधील गुंतवणूक ही अत्यंत लवचिक (फ्लेक्सिबल )असते. ही गुंतवणूक अत्यंत पारदर्शी असून आपण गुंतवलेला प्रत्येक रुपया कोठे गुंतवला गेला आहे हे आपल्याला समजू शकते.

## रुपी-कॉस्ट ॲव्हरेजिंगचा फायदा

शेअर बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत असतात कधी शेअरच्या किंमती वाढतात तर कधी घटतात. जेव्हा शेअरच्या किंमती वाढतात किंवा घटतात तेव्हा म्युच्युअल फंडाच्या युनिटची किंमतदेखील वाढते किंवा घटते. त्यामुळे एस. आय. पी. किंवा सिप मध्ये गुंतवणूकदारांना युनिटची किंमत जास्त असते तेव्हा कमी युनिट्स मिळतात आणि युनिटची किंमत कमी असताना अधिक युनिट्स मिळतात. यालाच 'रुपी-कॉस्ट ॲव्हरेजिंग' असे म्हणतात. दीर्घ कालावधीमध्ये युनिटची कमी आणि जास्त किंमतीची सरासरी होत असते. शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात चढउतार होत असल्यामुळे त्या त्या वेळी असलेल्या किंमतीप्रमाणे मिळालेले युनिटांची सरासरी काढल्यास युनिटसची संख्या वाढते. सातत्याने व नियमितपणे दीर्घकालीन गुंतवणूक केल्यास पॉवर ऑफ कंपांउंडिंगच्या प्रभावामुळे निश्चितपणे लाभ मिळतात.

एस.आय.पी. मध्ये गुंतवणूक करताना फार मोठी गुंतवणूक करण्याची गरज नाही. नियमितपणे आणि सातत्याने कमीतकमी १००० रुपयांची जरी दीर्घकालीन गुंतवणूक केली तरी मोठा लाभ होऊ शकतो. एस.आय.पी च्या माध्यमातून संपत्तीनिर्मिती साधायची असल्यास लहान वयातच गुंतवणूक करणे फायद्याचे ठरते. त्यामुळे कमी रकमेच्या एस.आय.पी. मधूनही मोठी संपत्तीनिर्मिती करता येते. दरवर्षी वाढणाऱ्या पगाराच्या किंवा व्यावसायिक उत्पन्नाच्या तुलनेत जर आपण एस.आय.पी च्या रकमेमध्ये १० ते १५ टक्क्यांनी वाढ केली तर अधिक वेगाने संपत्तीनिर्मितीसाठी आपल्याला त्याचा निश्चितपणे फायदा होतो. हल्ली बहुतांशी फंड हाउसेस 'स्टेप-अप एस.आय.पी.' (दरवर्षी ठराविक रकमेची आपोआप वाढ) हा पर्याय फॉर्म भरतानाच देत असतात ज्यात दर सहा महिन्यांनी अथवा वार्षिक रु. ५०० किंवा पाचशेच्या पटीत आपली गुंतवणूक वाढवण्याची सुविधा देतात, याचा प्रत्येक नवीन एस.आय.पी. सुरु करताना गुंतवणूकदाराने याचा अवश्य लाभ घ्यावा.

## एस.आय.पी चे फायदे

१. गुंतवणुकीचा शिस्तबद्ध पर्याय
२. पॉवर ऑफ कंपाउंडिंगचा (चक्रवाढ) फायदा
३. दर महिन्याला गुंतवणूक केल्यामुळे खिशावर ताण पडत नाही
४. छोट्या रकमेपासून सुरुवात करता येते.
५. ई.एल.एस.एस. योजनेमध्ये एस.आय.पी. पद्धतीने गुंतवणूक केल्यास सेक्शन ८० सी च्या अंतर्गत करलाभ मिळतो.
६. दीर्घकालीन गुंतवणुकीमधून संपत्तीनिर्मिती साधता येते.
७. गुंतवणुकीचा अत्यंत लवचिक पर्याय
८. अत्यंत साधा, सोपा आणि सुलभ गुंतवणूक पर्याय

एस.आय.पी. पद्धतीने गुंतवणूक करण्यापूर्वी तज्ज्ञ सल्लागाराची निवड करताना काही महत्वपूर्ण बाबी लक्षात घ्यायला हव्यात

१. सल्लागाराची विश्वासार्हता २. म्युच्युअल फंडाचा, बदलत्या मार्केट ट्रेंडचा सखोल अभ्यास ३. गुंतवणूक क्षेत्रातील उत्तम अनुभव ४. तुमची स्वप्ने आणि आर्थिक उद्दिष्टे जाणून घेण्याची संवेदनशीलता ५. पारदर्शी व्यवहार.

लेखक कायद्याचे पदवीधर असून 'गद्रेज नॉलेज ॲन्ड फायनान्शिअल सोल्युशन्स'चे (जी.के.एफ.एस.मुंबई)चे प्रवर्तक आहेत.

# दिल्लीच्या ‘नानी’ शीला दीक्षित यांचे निधन



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीचे १९९८ ते २०१३ दरम्यान सलग तीन वेळा मुख्यमंत्रिपद भूषविणाऱ्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या शीला दीक्षित यांचे नुकतेच निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या. राजधानीचा कायापालट करणाऱ्या शीला दीक्षित यांच्या आकस्मिक निधनामुळे दिल्लीच्या राजकीय वर्तुळावर शोककळा पसरली आहे.

दिल्ली काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा असलेल्या शीला दीक्षित काही दिवसांपासून आजारी होत्या.

त्यांच्या मागे पुत्र व माजी खासदार संदीप दीक्षित, तसेच कन्या लतिका असा परिवार आहे. सहृदयी व मनमिळावू स्वभावाच्या दीक्षित यांचे पक्षसीमा ओलांडून राजकीय वर्तुळात असंख्य चाहते होते. दिल्लीकरांसाठी त्यांनी पायाभूत सुविधांचे जाळे उभारले. दिल्ली मेट्रो प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी दिलेली साथ, ७०हून अधिक उड्डाणपुलांची उभारणी, लंडनच्या धर्तीवर गडद लाल रंगाच्या वातानुकूलित बस यामुळे त्यांनी दिल्लीकरांच्या मनात विशेष स्थान मिळवले होते.

**वृत्त सौजन्य : महाराष्ट्र टाईम्स्**

**शीला दीक्षित यांचे दिल्लीच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्या अत्यंत मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांच्या कुटुंबीयांचे आणि पाठीराख्यांचे मी सांत्वन करतो.**

– **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

**मला मोठा धक्का बसला आहे. दीक्षित काँग्रेसच्या लाडक्या सुकन्या होत्या. त्यांच्याशी आमचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांनी दिल्लीकरांची नि:स्वार्थीपणे सेवा केली.**

– **राहुल गांधी,** काँग्रेस नेते

हेल्पलाइन

## अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या



- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/ नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (झजउडज) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची 'सुहिता' हेल्पलाइन** — ७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in)

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०-२६१२६२९६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०-२६११२२२२, २६२०८२९५

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०-२६२०८३४१

**हेल्पलाइन**
१८१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०-२४४८४५३५

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२-८८८८८०९३०६

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१००/१८१



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com


प्रति / TO


RNI No. MAHMAR49593


If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला
आयोग, मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१